# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

१४

दि. १८/१०/२०२४



NEWS TODAY

# ई-वार्ता

## "कृषि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि हरित सेनेच्या वतीने विजयादशमीच्या दिवशी सोन्याची लागवड."













कृषि महाविद्यालयाच्या हरीत सेने अंतर्गत विजयादशमीच्या दिवशी आपटयाची २५ आणि जारूळ (महाराष्ट्राचे) फुल २५ रोपे लावून विजयादशमी साजरी करण्यात आली. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मकरंद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी आणि हरीतसेना प्रमुख डॉ. संतोष वरवडेकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या लागवडीसाठी वन विभागाचे दापोलीचे वनपाल श्री. रामदास खोत, वनरक्षक श्री. व्ही. डी. झाडे, श्री. सु. दी. जगताप, कु. शु. रा. भिलारे अणि कु. शु. दा. गुरव यांनी रोपे उपलब्ध करून दिली आणि लागवडीसाठीही सहभाग नोंदवीला.

या कार्यक्रमासाठी अनपेक्षीतरित्या जॉन डेरे इंडिया प्रा.ली. चे विभागीय संचालक श्री. मुकूल वाश्णेय यांनी उपस्थिती दर्शविली आणि लागवडीमध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमामध्ये व्दितीय वर्ष कृषिच्या कु. मिहीर जाधव, कु. शुभम रसाळ, कु. मनिष वालाणकर यांच्या समन्वयाने प्रथम वर्ष कृषिच्या पार्थ राठोड आणि एकुण ७४ हरीतमित्रांच्या सहाय्याने लागवड करण्यात आली.

स्वच्छता मोहीम राबवताना प्लॅस्टीक कचरा गोळा करण्याची महत्वपूर्ण भुमिका प्रथम वर्षाच्या मोहोपात्रा या विद्यार्थ्याने निभावली.

सर्वांच्या साक्षीने जमा केलेल्या प्लॅस्टीकचे दहन करण्यात आले. या नंतर डॉ. संतोष वरवडेकर यांनी पर्यावरण रक्षणाची शपथ हरीतमित्रांना दिली. कार्यक्रमादरम्यान हरीतमित्रांना चहा, बिस्कीट अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

### Mukul Varshney

I was very pleased to meet you that despite it being a Dussehra and a public holiday, you have been on the forefront for a purpose - a cause for environment Congratulations

Greetings and good wishes Dr Santosh It was such a pleasure to meet you and the young students Best wishes



Nice compliments to you. This is because of your keen interest and dedication. Congratulations

### Dr. Makarand Joshi